# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**दूरध्वनी क्रमांक :**
(०२०) २५६९ १२३३
२५६२ ११८८
२५६२ ११५७
२५६२ ११६१

**शैक्षणिक विभाग**
गणेशखिंड, पुणे—४११ ००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०—२५६९१२३३
संकेतस्थळ : www.unipune.ac.in
इ—मेल : affiliation@pun.unipune.ac.in

**संदर्भ क्र.:** सीए/2656 **दिनांक** : 02/11/2023

**कालमर्यादेचे व महत्वाचे**

प्रति,

मा. प्राचार्य,
विद्यापीठाशी संलग्नित
**कला, वाणिज्य, विज्ञान व बी.एस्सी. हॉस्पिटॅलिटी स्टडीज**
अभ्यासक्रमांची सर्व संबंधित महाविद्यालये

विषय : विद्यापीठाशी संलग्नित **कला, वाणिज्य, विज्ञान व बी.एस्सी. हॉस्पिटॅलिटी स्टडीज** अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांच्या शैक्षणिक वर्ष २०२३—२०२४ आणि २०२४—२०२५ च्या संलग्नीकरणाची/नैसर्गिकवाढीची माहिती स्वयं मूल्यमापन अहवालाद्वारे (Self Appriaisal Report) सादर करणेबाबत...

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत प्राप्त आदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, विद्यापीठाशी संलग्नित **कला, वाणिज्य, विज्ञान व बी.एस्सी. हॉस्पिटॅलिटी स्टडीज** अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांच्या शैक्षणिक वर्ष २०२३—२०२४ आणि २०२४—२०२५ साठीच्या संलग्नता/नैसर्गिकवाढ सुरू ठेवण्याच्या/नुतनीकरणाच्या मान्यतेकामी स्वयं मूल्यमापन अहवालाची माहिती (Self Appriaisal Report) ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाची आहे.

उपरोक्त अहवाल हा संबंधित संलग्नित/मान्यताप्राप्त महाविद्यालयांच्या/परिसंस्थेच्या PUNCODE वर उपलब्ध करून देण्यात आलेल्या लिंकवर काळजीपूर्वक भरून तसेच सदरहू अहवालातील मुद्दयांमध्ये नमूद केलेली आवश्यक ती कागदपत्रे (प्राचार्य, संचालक — शारीरिक शिक्षण, ग्रंथपाल, अध्यापकीय व अध्यापकेतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती/मान्यता इ.) संबंधित ठिकाणी Upload करून दिनांक ३१ डिसेंबर, २०२३ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत **केवळ ऑनलाईन पध्दतीने** सादर करावा.

उपरोक्त अहवाल व कागदपत्रांनुसार उक्त अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांच्या/परिसंस्थांच्या शैक्षणिक वर्ष २०२३—२०२४ आणि २०२४—२०२५ साठीच्या संलग्नता/नैसर्गिकवाढ सुरू ठेवण्याच्या/नुतनीकरणाच्या मान्यतेकामीची कार्यवाही करण्यात येणार आहे. त्याबाबत विद्यापीठ अधिकार मंडळाकडून घेण्यात येणारा निर्णय हा संबंधित महाविद्यालयांवर/परिसंस्थेवर बंधनकारक राहील, याची कृपया नोंद द्यावी.

कळावे,

2/11/2023

(स. द. डावखर)
उपकुलसचिव